| CNRNo.MHWR040003582018 | नोंदणी दिनांक | – | १६/०३/२०१८ |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | – | १६/०३/२०१८ |
| | निकाल दिनांक | – | १३/०५/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष. म. दि.<br>०८ ०१ २७ |

**निशाणी क्र.२२**

**नमुना क्र.३२**

**पार्ट-अ**

**(न्यायनिर्णयाची शिर्षक पृष्ठ)**

**फौजदारी नियमावली प्रकरण क्र. ६ चा परिच्छेद ४४ (i)**

**सेलु येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**ता. सेलु, जि. वर्धा**

**(पिठासीन अधिकारी – एस.आर.सातभाई)**

न्यायनिर्णय घोषीत दिनांक १३/०५/२०२६

**(नियमित फौजदारी खटला क्र.१५/२०१८)**

गुन्हा नोंद क्र.४१/२०१८, पोलीस स्टेशन सेलू, ता.सेलू जि.वर्धा

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन सेलू, ता.सेलू जि.वर्धा. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता –<br>श्रीमती व्ही.एम.गजभिये |
| **आरोपी** | १.<br><br>२. | **मोहन विठ्ठल परतेकी,**<br>वय – ४३ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>**मनिषा मोहनराव परतेकी,**<br>वय – ३६ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>दोघे राहणार – बोथली, ता. सेलू, जि. वर्धा. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | श्री. आर.एस.लिल्हारे |

**भाग – ब**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २७/१२/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २०/०१/२०१८ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | १६/०३/२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०७/१०/२०२२ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | ०७/१०/२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १३/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशांचा दिनांक | :- | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (**Set Off**) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मोहन विठ्ठल परतेकी | ३०/०१/२०१८ | ०७/०२/२०१८ | भा.दं.वि. कलम ३२६, ५०४, ५०६ सहकलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | मनिषा मोहन परतेकी | ३०/०१/२०१८ | ०७/०२/२०१८ | भा.दं.वि. कलम ३२६, ५०४, ५०६ सहकलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग –क

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))**

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार.**

अ. अभियोग पक्ष

| सा. | साक्षीदारांचे नांव | स्वरूप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | संगिता गोविंदराव सिराम | फिर्यादी | ०५ |
| २. | गोविंदा संभाजी सिराम | साक्षीदार | ०९ |
| ३. | सरस्वतीबाई महादेव सिराम | साक्षीदार | १० |
| ४. | माधुरी विजय चिक्राम | साक्षीदार | १४ |
| ५. | संजय हरिदास तुमडाम | पंच साक्षीदार | १६ |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार –

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

न्यायालयीन साक्षीदार –

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

ब. बचाव पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

क. न्यायालयामार्फत निशाणी फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.०६ | तोंडी रिपोर्ट |
| २. | निशाणी क्र.०७ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३. | निशाणी क्र.१७ | साक्षीदार क्र.०५ ची घटनास्थळ पंचनामावरील सहीला |

ड. भौतीक वस्तु -

| अनु क्रमांक | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | १२/२०१८ | एक वेळवाची काठी |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक : १३/०५/२०२६)

अभियोगपक्षाने सदर खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२६, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अंतर्गत दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे** –

२. दि.२७/१२/२०१७ रोजी सकाळी ०७.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादीची सासू पार्वताबाई श्रीराम हि अंगणामध्ये बसलेली होती. तेव्हा फिर्यादीच्या बक–या तिच्या घराच्या समोर रोडचे कडे बांधुन होती. तेव्हा आरोपी क्र.१ याची पत्नी आरोपी क्र.२ हिने पाणी शिंपले. तेव्हा फिर्यादी हिने आरोपी क्र.२ ला, "बकरीचे अंगावर पाणी शिंपू नको" असे म्हटले असता आरोपी क्र.१ व आरोपी क्र.२ ने फिर्यादी व तिची सासू सोबत वादविवाद करुन आरोपी क्र.१ ने घरातील काठी आणुन फिर्यादीची सासू पार्वताबाई हिला तिच्या कमरेवर व पाठीवर काठीने मारहाण केली. तसेच आरोपी क्र.२ हिने शिवीगाळ करुन धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन सेलू येथे तोंडी रिपोर्ट दिली. सदरची तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन सेलू येथे अपराध क्र.४१/२०१८ भारतीय दंड विधानाचे कलम ३२६, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.

३. तपासकामी तपासी अधिकारी श्री. प्रदिप तानबाजी मून यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा केला. आरोपींना अटक करुन अटक फॉर्म तयार केले. उपचाराकरिता दिलेले कागदपत्र व उपचाराचे कागदपत्र तसेच क्युरी रिपोर्ट प्राप्त केले. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्यांचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपींविरुद्ध दोषारोप निश्चीत करुन त्यातील मजकूर आरोपींना वाचून दाखविला व त्यांना मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात आला. आरोपींनी तो अमान्य करुन प्रकरण चालविण्यासाठी विनंती केली. आरोपींविरुद्ध अभियोगपक्षाने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यातुन गुन्हयाशी संबंधीत पुरावा अभिलेखावर आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) नुसार बयान अनुक्रमे निशाणी क्र.२० व २१ वर नोंदविण्यात आले आहे. आरोपींनी त्यांच्या बचावात खोटी केस केल्याचे तसेच त्यांना काही माहित नसल्याचा बचाव घेतला आहे. प्रस्तुत प्रकरणात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.एम.गजभिये तसेच आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. आर.एस.लिल्हारे यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभियोगपक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील बाबी विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो आहे काय दिनांक २७/१२/२०१७ रोजी सकाळी ०७.३० वाजताच्या दरम्यान मौजा बोथली, तालुका सेलू व जिल्हा वर्धा येथे आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीची सासू पार्वताबाई हिला लाकडी काडीने कमरेला व पाठीला मारहाण करुन इच्छापुर्वक जबर दुखापत पोहचविली, त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम ३२६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | **<u>नकारार्थी</u>** |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीला व तिची सासूला उद्देशपूर्वक अपमानकरुन त्यायोगे प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा अन्य कोणताही अपराध घडेल अश्या उद्देशाने शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला, म्हणून आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीच्या व तिची सासूच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली, म्हणून आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे आरोपी निर्दोष मुक्त.** |

## ...कारणमिमांसा...

६. अभियोगपक्षास आरोपींविरुद्धाचे आरोप सिद्ध करण्यासाठी हे दर्शविणे आवश्यक आहे की, आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीची सासू पार्वताबाई हिला लाकडी काडीने कमरेला व पाठीला मारहाण करुन इच्छापुर्वक जबर दुखापत पोहचविली, आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीला व तिची सासूला उद्देशपूर्वक अपमानकरुन त्यायोगे प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा अन्य कोणताही अपराध घडेल अश्या उद्देशाने शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला तसेच आरोपींनी फिर्यादीच्या व तिची सासूच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे

मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली, हे सिद्ध करणे आवश्यक आहे.

**मुद्दे क्र.१ ते ३ करीता :**

७. वरील सर्व मुद्दे एकाच प्रकारच्या पुराव्यावर अवलंबुन आहेत. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे मुद्दे एकत्रात विचारार्थ घेत आहे.

८. अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.१ संगिता (फिर्यादी) हिला निशाणी क्र.०५ वर नोंदविण्यात आले आहे. साक्षीदाराने तिच्या शपथेवरील जबाबात कथन केले की घटना दि.२७/१२/२०१७ रोजी सकाळी ०७.०० वाजताच्या सुमारास मनिषा परतेकी हि तिच्या बकरीवर पाणी शिंपडले, त्यावेळी तिच्या व तिच्या सासूसोबत पार्वताबाई सिराम हिच्यासोबत मनिषा आणि मोहन परतेकी यांचे वादावादी झाली. त्या वादावादीमध्ये मोहन परतेकी याने तिचे सासुबाईच्या कमरेवर व पाठीला काठीने मारले. त्यानंतर तिने सासूबाईला दवाखान्यात घेवुन गेली. तिला सदरची तोंडी रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर तिची सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. पोलीसांनी तिला दवाखान्यात पाठविले. त्यानंतर एक महिन्यांनी पोलीसांनी घटनेबाबत चौकशीकरुन केस तयार केली. पोलीसांना घटनास्थळ तिने दाखविले होते. पोलीसांनी तिचे बयान नोंदविले होते. ज्या काठीने तिच्या सासूबाईला मारहाण झाली होती, ती काठी तिला दाखविल्यास ती ओळखु शकते असे तिने सांगितले. तिला सदरची काठी दाखविण्यात आली, ती तीच असल्याचे तिने सांगितले.

घटनेच्या वेळी सरस्वताबाई सिराम, दसराबाई मसराम, माधुरी चिकराम असे हजर होत्या. आजुबाजुला रामोजी मसराम व महादेव सिराम हजर होते. तिच्या सासुबाईला पहिल्यांदा सेलू पी.एच.सी.येथे घेवुन गेले, त्यानंतर वर्धा येथे उपचाराकरिता घेवून गेले. तेथे त्या ०३ दिवस दाखल होत्या. सध्या तिच्या सासूबाई पार्वताबाई ह्या मयत असल्याचे सदरच्या साक्षीदाराने सांगितले आहे.

९. उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने नाकारले आहे की, घटनेच्या वेळी तिची सासू शेडमध्ये राहत होती व ती स्लॅबच्या घरामध्ये राहत होती. तिच्या सासूच्या वय ७० वर्षे असल्याने त्या चालू फिरु शकत नव्हत्या. तिचे व आरोपींचे पुर्वीपासुन पटत नसल्यामुळे त्यांचे विरुद्ध खोटी तक्रार दिली होती. परंतु आरोपींतर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने मान्य केले आहे की, ती तिचे बक–या आधीपासुनच सिमेंट रोडवर बांधत होती. त्यामुळे आरोपींच्या किराणा दुकानात येणा–या ग्राहकांना त्रास व्हायच्या. आरोपी मोहन परतेकी यांनी ग्राम पंचायत मध्ये तक्रार केली होती. यावरुन तिचे आरोपीची आई यशोदाबाई हिच्या सोबत भांडण सुद्धा झाले होते. तसेच पोलीस तिचे कडे आले तेव्हा त्यांना तिने काडी नेवुन दिली होती. महत्वाची बाब म्हणजे साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले आहे की, तोंडी रिपोर्ट देतेवेळी आरोपी मनिषा परतेकी हिने तिचे केस पकडल्याबाबत सांगितले होते, परंतु तसे तोंडी रिपोर्टमध्ये का नमुद नाही याचे कारण ती सांगता येणार नाही. तसेच फिर्यादीने तोंडी रिपोर्टमध्ये

उल्लेख केलेल्या अनेक साक्षीदारांपैकी अनेक साक्षीदार (दसराबाई मसराम, रामोजी मसराम, महादेव सिराम) हे अभियोगपक्षाने तपासले नाहीत.

**१०.** अभियोगपक्षाने आरोपींविरूध्द दोषारोपीत गुन्हे सिध्द करण्यासाठी व अभियोगपक्ष साक्षीदार क्रमांक १ च्या साक्षीला दुजोरा मिळण्याकरिता, अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ गोविंदा यांना निशाणी क्र.०९ वर नोंदविण्यात आले आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ते आरोपींना ओळखते. ते त्यांच्या शेजारी राहतात. तक्रारकर्ती संगिता हि त्यांची पत्नी आहे. पार्वताबाई हि त्यांची आई होती, ती सन २०२१ मध्ये मृत्यु पावली. दि.२७/१२/२०१७ रोजी सकाळी ०७.०० वाजताच्या दरम्यान ते त्यांचे घरी उभे होते व त्यांची पत्नी अंगणात काम करीत होती. सार्वजनिक रस्त्याचा बाजुला त्यांच्या बक–या बांधल्या होत्या. आरोपी मनिषा परतेकी हिने बक–यांवर पाणी शिंपडले. त्यांच्या पत्नीने हटकले असता आरोपी क्र.२ मनिषा हिने त्यांचे पत्नीसोबत भांडण केले. भांडण वाढत गेले व आरोपी क्र.२ हिने त्यांच्या घरी येवुन त्यांचे पत्नीचे केस पकडले व जिवे मारण्याची धमकी दिली होती. आरोपी क्र.१ हिने घरुन काठी आणली व त्यांच्या आईच्या कमरेवर आणि पाठीवर मारहाण केली. घटनेच्या वेळी महादेव सिराम, सरस्वताबाई सिराम, कान्हाबाई मसराम, माधुरी चिकराम हे लोक हजर होते. त्यांनी त्यांच्या आईला घेवुन सेलू येथील दवाखान्यात नेले. त्यानंतर त्यांची पत्नीने पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती. पोलीस चौकशीला आले होते. त्यांच्या आईला पुढील उपचारासाठी वर्धेला पाठविण्यात आला होता.

पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. पोलीसांनी त्यांचे बयान नोंदविले होते. ज्या काठीने त्यांच्या आईला मारहाण झाली होती, ती काठी ते ओळखु शकते असे त्यांनी सांगितले. परंतु अभियोगपक्षाकडुन निशाणी क्र.१२/२०१८ अंतर्गत जप्त काठी आर्टीकल–अ दाखविण्यात आली असता त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, “ही ती काठी नाही”.

**११.** आरोपींतर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने नाकारले आहे की, त्यांची आई म्हातारी असल्याने खाटेवरच राहत होती. परंतु आरोपींतर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने मान्य केले आहे की, आरोपीकडे किराणा दुकान आहे. त्यांच्या किराणाच्या दुकानासमोर ते त्यांच्या बक–या बांधत होते. त्या बक–यांमुळे ग्राहकांना त्रास होतो अशी तक्रार आरोपींनी ग्रामपंचायत कडे केली होती. त्या कारणावरुन कथीत घटनेच्या पुर्वी त्यांच्यात वाद झाला होता. त्यांनी हे देखील मान्य केले आहे की, घटनेच्या वेळी हजर असल्याचे ज्या साक्षीदारांची नावे त्यांनी पोलीसांना दिली होती, ती बयानात का नाहीत याचे कारण ते सांगू शकत नाहीत. तसेच घटनेनंतर अंदाजे एक महिन्यांनी पोलीस चौकशीला आले होते व पंचनामा सकाळी १२.०० वाजता केला होता. आरोपींकडुन त्यांच्यासमोर हे सूचविण्यात आले की, फिर्यादीच्या पत्नीने अंगणात नेहमी सकाळी सडा टाकत होती व त्या पाण्यावर त्यांच्या आईचा पाय घसरुन ती खाली पडली होती व त्यामुळेच त्यांच्या आईच्या कमरेला दुखापत झाली होती, ही सूचना त्यांनी नाकारली असली तरी यावरुन सदरील बाब घडली असल्याचे शक्यता निर्माण होते.

१२. अभियोगपक्षाने आरोपींविरूध्द दोषारोपीत गुन्हे सिध्द करण्यासाठी व अभियोगपक्ष साक्षीदार क्रमांक १ व २ च्या साक्षीला दुजोरा मिळण्याकरिता, अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ सरस्वतीबाई महादेव सिराम हिला निशाणी क्र.१० वर नोंदविण्यात आले आहे. साक्षीदाराने तिच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ते आरोपीला ओळखते. ते त्यांच्या गावाचे आहे. तक्रारकर्ती संगिता हिला ती ओळखते. पार्वताबाई यांना ती ओळखत होती. आरोपी मोहन याने पार्वताबाईला काठीने मारले होते. याशिवाय तिला काहीही माहित नाही. पोलीसांनी तिचे बयान नोंदविले नव्हते. आरोपींतर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने सर्वात महत्वाची मान्य केली आहे की, “घटना मी प्रत्यक्ष पाहिलेली नाही.” तसेच ती मान्य करते की, तक्रारकर्ती संगिता हि तिची चुलत सुन आहे. तक्रारकर्ती आणि आरोपी यांच्या घरे आमोरासमोर आहेत. संगिता यांचे घरामागे तिचे घर आहे. साक्षीदार ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसून तिचे पोलीसांकडे बयानही नोंदविण्यात आलेले नाही. अशा परिस्थितीत सदर साक्षीदाराची साक्ष ही केवळ ऐकीव स्वरुपाची असून पुराव्याचा कायदा कलम ६० अंतर्गत प्रत्यक्ष पुरावा होऊ शकत नाही.

१३. अभियोगपक्षाने आरोपींविरूध्द दोषारोपीत गुन्हे सिध्द करण्यासाठी, अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ माधुरी हिला निशाणी क्र.१४ वर नोंदविण्यात आले आहे. सदरची साक्षीदार ही फिर्यादीशी कोणतेही नाते–संबंध न दर्शविणारी स्वतंत्र शेजारी साक्षीदार आहे. साक्षीदाराने तिच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, आरोपी हा तिच्या घराशेजारी राहत

असल्यामुळे ती त्यांना ओळखते. फिर्यादी व तिची सासू हे घराजवळ राहत असल्यामुळे त्यांना ओळखते. कोरोना महामारीच्या पूर्वी आरोपी व फिर्यादीमध्ये वाद सुरु होता. तेव्हा ती घरी होती. आवाज आल्यामुळे ती घराबाहेर येवुन पाहिले असता तिला लोकांची गर्दी दिसली. तेव्हा तिला वाद असल्याचे समजले. परंतु वादाच्या कारणांबाबत तिला काहीही माहित नसल्याचे तिने सांगितले. आरोपींतर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने मान्य केले आहे की, भांडण हे कोणी कोणा सोबत केले त्याबाबत तिला माहिती नाही. भांडणाच्या कारणांबाबत तिला काहीही माहित नाही. महत्वाची बाब म्हणजे, सदर स्वतंत्र साक्षीदार ही फिर्यादीच्या कथनाला कोणत्याही प्रकारे दुजोरा देत नाही.

**१४.** शेवटी अभियोगपक्षाने आरोपींविरूध्द दोषारोपीत गुन्हे सिध्द करण्यासाठी, अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ संजय यांना निशाणी क्र.१६ वर नोंदविण्यात आले आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, दि.२१/०१/२०१८ रोजी ते रस्त्याने जात असतांना पोलीसांनी त्यांना आवाज देउन बोलविले. त्यावेळी पोलीस गोविंदराव यांच्या घराजवळ होते. पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी इथे आलेलो आहेत असे सांगितले व त्यांना त्यावर सही करण्यासाठी सांगितले. पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा केला नाही. पंचनाम्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे सांगितले. सदरचे साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने सरकारी वकिलांनी त्यांचा उलटतपास घेतला. परंतु त्यामध्ये साक्षीदाराने सर्व प्रतिकुल सूचना

नाकारलेल्या आहेत. आरोपींतर्फे घेतलेल्या उलटतपासात देखील साक्षीदाराने मान्य केले आहे की, दुसरे पंच कोण होते याबाबत त्यांना काही माहित नाही व त्यांच्या समक्ष पंचनामा केलेला नाही. यावरुन घटनास्थळ पंचनामा हा सिद्ध झालेला नाही.

**१५.** वरील सर्व साक्षीपुरावे, कागदोपत्री पुरावे व युक्तीवाद यांचा एकत्रित व सखोल विचार केल्यास असे आढळून येते की, अभियोगपक्षाची केस ही मुख्यतः फिर्यादी संगिता (सा.क्र.१), फिर्यादीचे पती गोविंदा (सा.क्र.२) व सा.क्र.३ सरस्वतीबाई यांच्या साक्षींवर आधारित आहे. यापैकी सा.क्र.१ व सा.क्र.२ हे फिर्यादी व तिचे पती असुन ते "आसक्त साक्षीदार" (interested witnesses) आहेत. सा.क्र.३ सरस्वतीबाई ही फिर्यादीची चुलत सासू असुन ती देखील आसक्त साक्षीदार आहे. आसक्त साक्षीदारांच्या साक्षी ग्राह्य धरता येतात, परंतु त्यांच्या साक्षींची फार बारकाईने व काळजीपूर्वक चाचणी करावी लागते.

**१६.** प्रस्तुत प्रकरणात स्वतंत्र साक्षीदार म्हणून तपासण्यात आलेल्या सा.क्र.४ माधुरी हिने अभियोगपक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. त्यांच्या साक्षीनुसार वादाच्या कारणांबाबत तिला काहीही माहित नसल्याचे तिने सांगितले. तसेच आरोपींतर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने मान्य केले आहे की, भांडण हे कोणी कोणा सोबत केले त्याबाबत तिला माहिती नाही. भांडणाच्या कारणांबाबत तिला काहीही माहित नाही. त्यांच्या साक्षीत फिर्यादीच्या सासूला गंभीर मारहाण झाल्याचे समर्थन

आढळत नाही. अभियोगपक्षास या साक्षीदाराकडून आरोपींविरुद्ध कोणताही ठोस व निर्विवाद पुरावा सिद्ध करता आलेला नाही.

**१७.** घटनास्थळ पंच म्हणून तपासण्यात आलेल्या सा.क्र.५ संजय यांनी त्यांच्या साक्षीत त्यांच्या समक्ष पोलीसांनी कोणताही पंचनामा केला नाही. तसेच पंचनाम्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहिती नाही असे त्यांनी सांगितले. त्यामुळे पंचनामा प्रत्यक्ष घटनास्थळी व तत्काळ तयार झाल्याबाबत शंका निर्माण होते. तसेच अभियोगपक्षाने दुसरा पंच साक्षीदार तपासलेला नाही. अशा परिस्थितीत घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा हा सिद्ध झालेला नाही.

**१८.** पुढे, अत्यंत महत्वाची व निर्णायक बाब म्हणजे, सा.क्र.२ गोविंदा यांना न्यायालयात निशाणी १२/२०१८ अंतर्गत जप्त केलेली काठी आर्टीकल–अ दाखविली असता त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, “ही ती काठी नाही”. म्हणजेच जी काठी जप्त केल्याचे अभियोगपक्ष म्हणतो, ती घटनेच्या वेळी वापरले गेले होते असे अभियोगपक्षाचा स्वतःचाच साक्षीदार नाकारतो. यामुळे जप्त काठीचे घटनेशी असलेले संबंध पूर्णतः खंडित होतो.

**१९.** आणखी एक महत्वाचा मुद्दा असा की, घटना दि.२७/१२/२०१७ रोजी घडली असून प्रथम खबरी अहवाल दि.२०/०१/२०१८ रोजी म्हणजेच जवळपास २४ दिवसांच्या विलंबाने नोंदविण्यात आला आहे. इतक्या प्रदीर्घ विलंबाचे समाधानकारक स्पष्टीकरण अभियोगपक्षाकडून अभिलेखावर देण्यात आलेले नाही. प्रथम खबरी

अहवाल हा अत्यंत महत्वाचा दस्ताऐवज आहे आणि त्यातील विलंब अभियोगपक्षाच्या केसवर गंभीर परिणाम घडवितो. फिर्यादीने पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर सुमारे एक महिन्यांनी पोलीसांनी चौकशीला येऊन केस तयार केली, असे फिर्यादीच्याच साक्षीतून निष्पन्न होते. यावरुन अभियोगपक्षाच्या तपासाची त्वरीतता व निष्पक्षता यावर संशय निर्माण होतो.

२०. आणखी एक मुद्दा गंभीरपणे विचारात घेण्याजोगा आहे. आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ अंतर्गत आरोप आहे. कलम ३२६ अंतर्गत दोष सिद्ध करण्यासाठी इजा "जबर दुखापत" असल्याचे सिद्ध करणे अनिवार्य आहे. पीडित पार्वताबाई हिला कोणत्या स्वरुपाची इजा झाली, ती इजा भारतीय दंड संहितेच्या कलम ३२० अंतर्गत "जबर दुखापत" च्या व्याख्येत बसते का, याबाबत वैद्यकीय अधिकारी यांचा साक्ष अनिवार्य होता. प्रस्तुत प्रकरणात वैद्यकीय अधिकारी यांना अभियोगपक्षाने तपासलेले नाही. इंज्युरी सर्टिफिकेट किंवा एम.एल.सी. अभिलेखावर सिद्ध करण्यात आलेले नाही.

२१. त्याचप्रमाणे तपासी अधिकारी श्री. प्रदीप तानबाजी मून यांना देखील अभियोगपक्षाने तपासलेले नाही. दि.१३/११/२०२४ रोजीच्या समंस रिपोर्टनुसार ते मयत असल्याचे अभिलेखावर आले आहे. तपासी अधिकाऱ्याची साक्ष नसल्याने तपासाच्या वैधतेबाबत, घटनास्थळी झालेल्या तपासणीबाबत, जप्ती व पंचनामा तयार करण्याच्या कार्यवाहीबाबत न्यायालयासमोर कोणताही प्रत्यक्ष पुरावा आलेला नाही. वैद्यकीय अधिकारी

व तपासी अधिकारी हे दोघेही न तपासल्यामुळे प्रकरणाच्या तपासाची साखळी जोडली गेली नाही.

२२. आणखी एक बाब लक्षात घेण्याजोगी अशी की, अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ संगिता हिने तिच्या तोंडी रिपोर्टमध्ये दसराबाई मसराम, रामोजी मसराम, महादेव सिराम, सरस्वताबाई सिराम व माधुरी चिक्राम हे प्रत्यक्षदर्शी म्हणून हजर असल्याचे सांगितले होते. परंतु यापैकी दसराबाई मसराम, रामोजी मसराम व महादेव सिराम या प्रत्यक्षदर्शी म्हणून सांगितलेल्या व्यक्तींना अभियोगपक्षाने तपासले नाही. सरस्वताबाईने स्वतः उलटतपासात कबूल केले की तिने घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही व माधुरीने वाद कोणाचा कोणासोबत व कोणत्या कारणाने झाला हेच माहीत नसल्याचे सांगितले. अशा प्रकारे फिर्यादीच्या स्वतःच्या तोंडी रिपोर्टातील प्रत्यक्षदर्शींची साक्ष न आल्याने व जे साक्षीदार तपासले त्यांनीही समर्थन न दिल्याने अभियोगपक्षाची केस सिद्ध होऊ शकत नाही.

२३. अभियोगपक्षाने केलेल्या आरोप क्र.२ व ३ बाबत, म्हणजेच भा.दं.वि.कलम ५०४ व ५०६ बाबत विचार केल्यास, कलम ५०४ अंतर्गत दोष सिद्ध करण्यासाठी हे आवश्यक आहे की, आरोपीने जाणुनबुजुन अपमान केला असून तो अपमान असा होता की त्यामुळे फिर्यादीला प्रक्षोभन व्हावे व त्यायोगे सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा अन्य अपराध घडेल असा हेतू असला पाहिजे. प्रस्तुत प्रकरणात आरोपींनी फिर्यादीला कोणत्या विशिष्ट शब्दात शिवीगाळ केली, याबाबत कोणत्याही साक्षीदाराने ठोस व विशिष्ट

कथन केलेले नाही. केवळ “शिवीगाळ केली” अशा सर्वसाधारण व अस्पष्ट कथनावरुन कलम ५०४ चे आवश्यक घटक सिद्ध होत नाही.

२४. त्याचप्रमाणे कलम ५०६ अंतर्गत दोष सिद्ध करण्यासाठी आरोपीने पीडितास जीव, संपत्ती किंवा प्रतिष्ठेच्या नुकसानीची धमकी देवून भयभीत करण्याचा हेतू बाळगणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात आरोपींनी कोणत्या विशिष्ट शब्दात धमकी दिली व त्यामुळे फिर्यादी किंवा तिची सासू भयभीत झाली, याबाबत कोणताही ठोस पुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. केवळ “जीवे मारण्याची धमकी दिली” अशा रुटीन कथनावरुन कलम ५०६ चे घटक सिद्ध होत नाहीत.

२५. आरोपी क्र.१ व २ यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये दिलेल्या बयानात (निशाणी क्र.२० व २१) त्यांच्याविरुद्ध आलेले सर्व पुरावे नाकारुन त्यांच्याविरुद्ध खोटी केस दाखल केली असल्याचा बचाव घेतला आहे. आरोपींतर्फे करण्यात आलेल्या उलटतपासात आरोपींनी असे एक वैकल्पिक कथन पुढे आणले आहे की, फिर्यादी संगिता ही नेहमी सकाळी अंगणात पाण्याचा सडा टाकत असे व त्या ओल्या पाण्यावर पार्वताबाईचा पाय घसरुन ती पडली होती, त्यामुळेच तिच्या कमरेला दुखापत झाली होती. हे वैकल्पिक कथन फिर्यादी व सा.क्र.२ यांना उलटतपासात सूचित करण्यात आले होते व त्यांनी ते नाकारले असले तरी, फिर्यादीच्या व सा.क्र.२ च्या साक्षीतून पुढे आलेल्या अंतर्विरोध, बक–यांवरुन पूर्वीचा वाद, ग्रामपंचायत मधील तक्रार,

आरोपीच्या आई यशोदाबाईसोबत झालेला भांडण, उधारीच्या पैशांचा वाद, ही सर्व पार्श्वभूमी पाहता आरोपींच्या वैकल्पिक कथनाला पुष्टी मिळते. किमान यावरुन आरोपींना खोट्या प्रकरणात गोवण्यात येण्याची संभाव्यता नाकारता येत नाही.

२६. फौजदारी न्यायशास्त्राचे मूलभूत तत्व असे आहे की, अभियोगपक्षावर आपली केस संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्याची सक्त जबाबदारी असते. आरोपीला त्याची निर्दोषता सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. आरोपीच्या बाजुने उद्भवणाऱ्या प्रत्येक रास्त संशयाचा फायदा आरोपीस मिळतो. केवळ शक्यता, अंदाज अथवा तर्काच्या आधारे आरोपींना दोषी ठरविता येत नाही.

२७. प्रस्तुत प्रकरणात ना प्रत्यक्षदर्शी साक्षीदार पूर्णतः विश्वासार्ह आहे, ना पंचनामा व जप्ती विश्वसनीय आहेत, ना वैद्यकीय पुरावा अभिलेखावर आला आहे, ना तपासी अधिकाऱ्याची साक्ष झालेली आहे, ना जप्त मुद्देमाल एक वेळवाची काठी हे घटनेच्या वेळी वापरलेले होते हे सिद्ध झालेले आहे. प्रथम खबरी अहवालामध्ये २४ दिवसांचा अस्पष्ट विलंब आहे. साक्षीदार क्र.१ व २ हे आसक्त (फिर्यादी व तिचा पती) साक्षीदार आहेत, सा.क्र.३ ही फिर्यादीची चुलत सासू असून तिने स्वतः घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही असे कबूल केले आहे, सा.क्र.४ स्वतंत्र साक्षीदार असून तिने अभियोगपक्षास समर्थन दिले नाही व सा.क्र.५ पंच साक्षीदार विरोधी झालेला आहे.

२८. शिवाय, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये बक–या रोडवर बांधण्यावरुन, किराणा दुकानात येणाऱ्या ग्राहकांना होणाऱ्या त्रासावरुन, आरोपींनी ग्रामपंचायत मध्ये तक्रार केल्यावरुन, आरोपीची आई यशोदाबाई सोबत झालेल्या भांडणावरुन, तसेच उधारीच्या पैशांच्या मागणीवरुन पूर्वीपासुनच गंभीर वाद व मतभेद असल्याचे फिर्यादी व सा.क्र.२ यांच्या उलटतपासातून स्वतःच कबूल केले गेले आहे. अशा परिस्थितीत खोट्या प्रकरणात गोवण्याची संभाव्यता पूर्णपणे नाकारता येत नाही.

२९. वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार करता, आरोपीं विरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोगपक्ष आरोपींविरुद्धचे आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यात पूर्णतः असफल ठरला आहे. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपींना मिळतो आणि आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेचे कलम ३२६, ५०४ व ५०६ नुसार गुन्हा केल्याची बाब सिध्द झालेली नाही. वरील विवेचनावरुन मी मुद्दे क्र.१ ते ३ चे नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीता :**

३०. वरील कारणमिमांसा व मुद्दा क्र.१ ते ३ वरील नकारार्थी निष्कर्षांच्या आधारे, खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ **मोहन विठ्ठल परतेकी** व आरोपी क्र.२ **मनिषा मोहनराव परतेकी** यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१)] अन्वये गुन्हा

क्र.४१/२०१८ भारतीय दंड विधानाचे कलम ३२६, ५०४ व ५०६ सहकलम ३४, पोलीस स्टेशन सेलू, या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जमानतनामा व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल एक वेळवाची काठी ही मुल्यहीन असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर कायदेशिररित्या नष्ट करण्यात यावा.

४. आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तीक मुचलका भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ] प्रमाणे दाखल करुन पुर्तता करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.05.13 16:00:30 +0530

(एस.आर.सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
सेलू, जि.वर्धा

**दिनांक** : १३/०५/२०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)